# दादाभाई नौरोजी यांचे आर्थिक विचार

**सचिन गुंडीराम डेंगळे**
संशोधक विद्यार्थी
प्राथमिक – पदवीधर
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,अजनी (बु.)
ता. शिरुर अनंतपाळ, जि. लातूर.
**संपर्क :** 9404353153

**प्रस्तावना :–**

दादाभाई नौरोजींना आधुनिक भारताचे पितामह म्हणून संबोधले जाते. त्यांचा जन्म ४ सप्टेंबर १८२५ मध्ये झाला. १८४५ पर्यंत त्यांनी उच्च शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर त्यांना गणित व भौतिक विषयाचे प्राध्यापक म्हणून एलफिन्स्टन कॉलेज, मुंबई येथे नौकरी करण्याची संधी मिळाली. १८५३ मध्ये त्यांनी बॉम्बे असोसिएशन ची स्थापना केली आणि तेथूनच राजकीय जीवनाला सुरुवात झाली. त्यांच्या विचारसरणीवर मेकॉले विल्बर फोर्स यांच्या विचारांचा प्रभाव होता. त्यांनी आपल्या इंग्लंडमधील वास्तव्यात १८६७ साली इस्ट इंडिया असोसिएशन ची स्थापना केली आणि त्याद्वारे आपल्या मागण्या पुढे रेटण्याचे प्रयत्न केले. १८७४ मध्ये बडोदा संस्थानामध्ये दिवान या उच्च पदावर त्यांची नियुक्ती झाली. १८८५ मध्ये मुबई प्रांतिक विधी मंडळाचे सदस्यत्व देण्यात आले. १८९२ ते १८९५ या दरम्यान त्यांनी हाऊस ऑफ कॉमनस चे सदस्य म्हणून काम केले. या काळात त्यांचा ब्रिटिश पंतप्रधान ग्लॅडस्टन व अन्य राजकी मुत्सद्दी व विचारवंतांशी संबंध आला. १८५७ च्या बंडाचा बिमोड करण्यासाठी ब्रिटिशांनी विनाकारण जास्तीचा खर्च केला. त्यामुळे विकासाची कामे आडून बसली असे त्यांचे मत होते. ते १८८६ मध्ये, १८९३ मध्ये व १९०६ मध्ये राष्ट्रीय कॉंग्रेसचे अध्यक्ष म्हणून निवडले गेले. त्यांचा मृत्यू ३० जून १९१७ रोजी झाला. त्यांचे विचार पॉव्हर्टी ॲण्ड अन्ब्रिटिश रुल इन इंडिया या त्यांच्या ग्रंथाद्वारे स्पषट होतात. सदरील लेखामध्ये आपण त्यांच्या आर्थिक विचारांवर अभ्यास करणार आहोत.

**आर्थिक विचार :–**

भारतीय राष्ट्रवादाची आर्थिक पायावर उभारणी करण्याचे श्रेय प्रामुख्याने दादाभाई नौरोजीकडे जाते. त्यांच्या समकालीन राजकीय नेत्यांनी भारतीय राष्ट्रवादी चळवळ प्रामुख्याने धर्मनिरपेक्ष ठेवण्याचा प्रयत्न केला. समकालीन विचारांना दिशा देण्यात नौरोजींचा वाटा सिंहाचा होता असेच म्हणावे लागेल. नंतरच्या काळात जहालांनी राष्ट्रवादी विचारास भावनात्मक बनविण्याचा व त्याला धार्मिक अधिष्ठान देण्याचा प्रयत्न केला. परंतु नौरोजींनी भारताचे आर्थिक शोषण आणि देशाच्या आर्थिक प्रगतीचे प्रश्न यांना राष्ट्रवादाचे आधार बनवले. भारतीय संत्तीचा फार मोठा ओघ परदेशाकडे लागला आहे आणि यातून भारताचे प्रचंड शोषण होत आहे, ही गोष्ट दादाभाईंनी सर्व प्रथम प्रभावीपणे निदर्शनास आणून दिली. भारताचे दादिद्र्य हे या कठोर शोषणाचा परिणाम आहे आणि या शोषणातूनच देशाला दुष्काळ, उपासमार आणि रोगराई या सारख्या आपत्तींना वारंवार वाढत्या प्रमाणात तोंड द्यावे लागत आहे हे त्यांनी दाखवून दिले. उपलब्ध आकडेवारीचे शक्य तेवढेच सर्व सत्य पुरावे देऊन त्यांनी भारतातील आर्थिक समस्या उलगडून दाखवण्याचा प्रयत्न केला. आपल्या लेखनात ते शास्त्रीय पद्धतीचा वापर करीत. आलंकारिक भाषा आणि आधारावाचून काढलेले निष्कर्ष या गोष्टींचा त्यांना तिटकारा होता.

**प्रवाही शोषणाचा सिद्धांत :-**

भारताच्या आर्थिक दैन्याचे कारण म्हणजे ब्रिटिशांनी या देशासाठी वापरलेली असमर्थनीय आणि अस्वाभाविक नीती असे ते म्हणत. या अस्वाभाविक नीतीचा एक पैलू म्हणजे राजकीय सत्तेचा फायदा घेऊन भारतावर लादण्यात येणारी सार्वजनिक कर्जे, भारताच्या व इंग्लंडच्या प्रशासनावर होत असलेल्या अवास्तव खर्चाचा बोजा ब्रिटिश लोक भारतावर लादतात. परिणामी भारतीय लोकांना त्यांचे नैसर्गिक हक्क गमवावे लागतात आणि त्यांची उदरनिर्वाहाची साधने नष्ट होतात. पर्यायाने उदरनिर्वाहाचा त्यांचा हक्कच अमान्य केल्यासारखे होते म्हणून देशाच्या आर्थिक विकासासाठी पैशांचा हा विनाशकारी ओघ थांबणे आवश्यक आहे. हे प्रवाही शोषण थांबल्यावाचून आणि भारतीयांना त्यांचे नैसर्गिक हक्क मिळाल्यावाचून देशाची भौतिक उन्नती अशक्य आहे. म्हणजे ब्रिटिश राज्यकर्त्यांनी आर्थिक क्षेत्रात भारतीयांचे ज्यावेळी ह्यूम, व्हिको आणि बेन्थॅम नैसर्गिक हक्कांच्या संकल्पनेबरोबर टीका करीत होते, त्याचवेळी निराळया वसाहतिक संदर्भात भारतामध्ये नौरोजी ती कल्पना उचलून धरतात.

**(१) आर्थिक नियमात कृत्रिम हस्तक्षेप :-**

कठोर आर्थिक नियामांचा स्वाभाविक आविष्कार हा भारताच्या शोषणास व परिणामी त्यांच्या अनंत दैन्यास कारणीभूत आहे असे सर्वसाधारणपणे त्या काळी देशाच्या दारिद्र्याचे स्पष्टीकरण दिले जात असे. नौरोजी हे स्पष्टीकरण अमान्य करतात आणि उलट असे प्रतिपादन करतात की आर्थिक नियमांचा स्वाभाविक आविष्कार नव्हे तर अशा स्वाभाविक आविष्काराच्या मार्गात हेतूपुरस्तर उपस्थित केल्या जाणाऱ्या अडचणी व त्यात होणारे हस्तक्षेप हे शोषणास आणि दैन्यास कारणीभूत आहेत. ते लिहितात –

"......... काही लोक नियमांच्या निर्दय आविष्कारासंबंधी बोलतात परंतु ते हे विसरतात की, भारतात आर्थिक नियमांना स्वाभाविकपणे अविष्कृत होऊच दिले जात नाही. भारताच्या विनाशास आर्थिक नियमांचा स्वाभाविक आविष्कार कारणीभूत नसून, ब्रिटिशांच्या चूकीच्या धोरणाची क्रूर अम्मलबजावणी त्यास कारणीभूत आहे; भारतात राहून भारतास खाण्याची आणि उरले सुरले इंग्लंडकडे प्रवाहित करण्याची आमच्या राज्यकर्त्यांची नीती त्यास कारणीभूत आहे; किंवा निराळया शब्दात आर्थिक नियमांचा क्रूर विपर्यास, त्यांना तोडण्याचा, मुरड घालण्याचा प्रयत्न हा आमच्या दैन्याच्या मुळाशी आहे... नैसर्गिक व आर्थिक नियमांना येथे मुक्तपणे आविष्कृत होऊ द्या म्हणजे भारताचे दुसरे इंग्लंड बनेल आणि यातून खुद्द इंग्लंडलाही आजच्या पेक्षा किती तरी जास्त फायदा होईल." अशा प्रकारे ब्रिटिशांच्या आर्थिक नियमातील कृत्रीम हस्तक्षेपावर आपले मत त्यांनी व्यक्त केले आहे.

**(२) शोषणाचे मार्ग :-**

दादाभाईंनी आपला प्रवाही आर्थिक शोषणाचा सिद्धांत अधिकृत आकडेवारी आणि या विषयातील तज्ज्ञांची मते यांच्या आधारे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला इंग्लंड दूर अंतरावरुन भारतावर राज्य करते, ते अत्यंत महाग पडते. हा न परवडणारा खर्च ब्रिटिश लोक भारतावर बसवतात. त्यामुळे देशावर असहय असा आर्थिक ताण पडतो. शिवाय देशातील द्रव्य निरनिराळया मार्गांने इंग्लंडला नेले जाते त्यामुळे देशात भांडवल निर्मिती होत नाही. दरवर्षी तीनशे ते चारशे पौंड एवढी संपत्ती इंग्लंडकडे प्रवाहीत होत आहे. ही संपत्ती ब्रिटिश लोक निरनिराळया मार्गांनी नेतात. या संदर्भात नौरोजी शोषणाचे प्रवाह खालीलप्रमाणे दाखवतात.

(१) ब्रिटिश अधिकाऱ्यांचे पगार व निवृत्ती वेतन.

(२) शासनाचा भारतातील व इंग्लंडमधील खर्च.

(३) भारतातील ब्रिटिश सैन्यावर होणारा खर्च.

(४) ब्रिटिश व्यावसायिकांनी इंग्लंडला पाठवलेला नफा.

(५) कारण नसताना भारतावर लादलेले युद्धखर्च, इत्यादी.

हे प्रवाह भारतात भांडवली संचय होऊ देत नाहीत आणि ब्रिटिश लोक मात्र त्यांनी येथून नेलेला पैसाच परत या देशाचे शोषण पुढे चालविण्यासाठी विस्तारित भांडवल म्हणून वापरतात. त्यामुळे येथील सर्व व्यापार आणि उद्योगांवर त्यांना आपली मक्तेदारी स्थापन करता येते.

हे प्रवाही शोषण देशात आर्थिक विकासाची प्रक्रियाच सुरू होऊ देत नाही. चैनबाजी आणि ऐषाराम यांची सवय जडलेल्या परकीय नोकरशाहीचा प्रचंड खर्च या गरीब देशावर बसतो. त्यातून करांचा असह्य बोजा येतो. शोषणाच्या उद्देशाने परकीय सत्तेने तयार केलेले आर्थिक धोरण देशी व्यापर उद्योगांना मारक ठरते. विपुल साधन संपत्ती असलेल्या देशातील बहुतांश लोक दारिद्र्यात खितपत पडलेले असा विरोधाभास या शोषणातून निर्माण होतो. १९ व्या शतकात प्रारंभी ३० लक्ष पौंड संपत्तीचे वार्षिक शोषण होते. तेथे आता ३०० लक्ष पौंड प्रति वर्षी प्रवाहित होत आहेत. त्यामुळे देशी लोकांची थोडी फार असलेली बचतीची आशा आता पूर्णत: संपुष्टात आली आहे. त्यामुळे देशात औद्योगिक विकास अशक्य झाला आहे.

**(३) शोषणाची अतुट साखळी :-**

भांडवली सचयाच्या प्रक्रियेत एक दुष्ट प्रवृत्ती असते. एकदा संचयित झालेले भांडवल राक्षसी वेगाने सारखे वाढतच जाते. इंग्लंडचे धोरण भारताच्या एकेरी शोषणाचे नाही तर अशा शोषणातून उभारलेल्या भांडवलाच्या आधारे पुढे शोषणाची एक अतूट साखळीच निर्माण करण्याचे आहे. यातून त्यांनी अत्यंत गुंतागुंतीची अशी शोषण प्रक्रिया निर्माण केली आहे जी भारताच्या परिपूर्ण आर्थिक विनाशास कारणीभूत होत आहे.

**(४) नवा धोका :-**

या विषयी ते लिहिताता :

''यातून भारतापुढे आता नवा धोका उभा आहे. आतापर्यंत त्यांना फक्त भूमीवरील संपत्तीची लूट केली. आता यातून संचयित झालेल्या भांडवलाच्या आधारे ते भूगर्भातील खजिन संपत्तीचीही लूट करणार आहेत. या लुटीच्या उद्योगात ते भारतीयांना फक्त कनिष्ठ स्तरावरील शारीरिक व बौद्धिक नोकऱ्या देतील. परिणामी निरनिराळया मार्गांनी म्हणजे मोठया हुद्दयावरील नोकरांच्या पगाराच्या स्वरूपात, नफा व गुंतवणुकीचा वाटा यांच्या स्वरूपात या संपत्तीचा आपल्याला कनिष्ठ स्तरावरील नोकऱ्या तरी मिळतील याचेच आभार बिचाऱ्या

असहाय्य भारतीयांना मानीत बसावे लागेल आणि परत जोरजोरात ब्रिटिश प्रचारकी भारताचा हा फायदा झाला. अगदी त्याच तालासुरात जशा आता रेल्वे. परकीय व्यापाऱ्यांच्या तुताऱ्या वाजत आहेत." अशा प्रकारे त्यांनी भारतीय जनतेस नव्या धोक्या विषयी जागृत करण्याचा प्रयत्न केला आहे.

**(५) नैतिक शोषण :–**

नोकऱ्यामध्ये उच्चपदावर केवळ ब्रिटिश लोकांचीच नेमणूक ही सुद्धा भारताच्या प्रगतीस अनेक दृष्टीने मारक ठरत आहे. एक तर त्यांचे पगार आणि पेन्शन या रूपाने पैसा इंग्लंडला जातो, समान पात्रतेच्या भारतीय लोकांना अशा पदावर नेमणुका न मिळाल्याने त्यांच्यात न्यूनगंड निर्माण होतो व उच्च पात्रता मिळवण्याची प्रेरणा त्यांना मिळत नाही. भारतात प्रशासनिक अनुभव प्राप्त केलेले अधिकारी इंग्लंडला निघून गेल्याने येथे अनुभव सिद्ध प्रशाससनिक ज्ञानाची नेहमीच पोकळी राहते आणि भारताला प्रशिक्षण शाळेचे किंवा शिकाऊ भूमीचे स्वरूप प्राप्त होते. अशा रीतीने उपजिल्हाधिकाऱ्याच्या पातळीवरील निरनिराळया पदावरील राजकीय, प्रशासनिक तसेच वैधानिक अनुभव ब्रिटिश अधिकारी इंग्लंडला घेऊन जातात.

या अनुभव प्रवाहास नौरोजी नैतिक शोषण म्हणतात. या पूर्वी देशावर बरीच आक्रमणे झाली. येथे परकीयांनी राज्यही केले. परंतु त्यावेळी देशास या नैतिक शोषणाचा अनुभव घ्यावा लागत नाही. ब्रिटिशांपूर्वीचे आक्रमक एक तर देशात लूट करून निघून गेले किंवा येथेच स्थायिक झाले. ते जेव्हा इथे स्थायिक होत तेव्हा त्यांची संपत्ती आणि त्यांचा अनुभव देशातच राहत असे. ते लूट करून निघून गेलेच तर फक्त संपत्तीच घेऊन जात. परंतु ब्रिटिशांचे आर्थिक व नैतिक अशा दुहेरी शोषणाचे विनाशकारी धोरण भारताचे अखंड प्रवाही शोषण करीत आहे आणि देशाचे कर्ज सतत वाढत आहे. भारताचे रक्तशोषण करणे हेच ब्रिटिशांचे धोरण आहे. पूर्वीचे राज्यकर्ते भारतास. मनास वाटेल तेव्हा. इथे तिथे खाटका प्रमाणे कापीत होते. परंतु इंग्लंडचे बुद्धिमान राज्यकर्ते सफाईदार शस्त्रांनी शस्त्रक्रिया करून भारताचे हृदयच कापू नेत आहेत आणि विशेष म्हणजे या आर्थिक विनाशाच्या प्रक्रियेस 'प्रगती, संस्कृती' इत्यादी नावांनी संबोधले जात आहे.

अशा रितीने दादाभाई नौरोजींनी ब्रिटिशांच्या आर्थिक धोरणावर आपले विचार व्यक्त करुन कडाडून टिका केली आहे. त्यांच्या मते अशा प्रकारचे शोषण न्यासिद्धांताची तर अवहेलना करतेच पण साध्या राजकीय अर्थशास्त्राच्या तत्वाचीही पायमल्ली करते. भयानक दुष्काळाची पुनरावृत्ती लक्षावधी अर्धपोटी किंवा उपाशी लोक, रोगराईचा प्रादुर्भाव या गोष्टी पाहून नौरोजींना मनस्वी दुःख होत होते. भरमसाठ जमीन महसूल, कराचा

**असाहय बोजा, त्यात मिठासारखे कर, ब्रिटिश धोरणामुळे प्रतिवर्षी लक्षावधी नवी कुटुंबे आर्थिकदृष्टया अक्षरशा: उध्वस्त होत होती.**

**आर्थिक शोषण हाच ब्रिटिश साम्राज्याचा पाया आहे. प्रगती, संस्कृती या केवळ घोषणा आहेत. हे नौरोजींनी पुरते ओळखले होते. ब्रिटिश साम्राज्यशाही देशाचे किती भयानक आर्थिक शोषण करीत आहे. हे शास्त्रशुद्ध विशलेषणाद्वारे लोकांपुढे मांडण्याचा ते प्रयत्न करतात.**

## संदर्भ सूची

1) पाटील अ.आ., गायकवाड रा.ज्ञा., " आधुनिक भारत", राविल पब्लिकेशन, सातारा, १९७४, पृष्ठ क्र.८०.

२) देशपांडे प्र.न., " अर्वाचीन भारत ", कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७६, पृष्ठ क्र.३१८.

3) जावडेकर श.द., " आधुनिक भारत ", कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २००९, पृष्ठ क्र.१०९.